राफेल नदालची निवृत्ती

पुढील महिन्यात डेव्हिस चषकाच्या अंतिम टप्प्यात अखेरचा सामना

वृत्तसंस्था, माद्रिद

पुढील महिन्यात होणाऱ्या डेव्हिस चषक स्पर्धेच्या अंतिम टप्प्यानंतर आपण टेनिसला अलविदा करणार असल्याचे स्पेनच्या २२ ग्रँडस्लॅम विजेत्या राफेल नदालने गुरुवारी जाहीर केले. नदालला गेल्या काही वर्षांत विविध दुखापतींचा सामना करावा लागला असून याचा त्याच्या शारीरिक तंदुरुस्तीवर आणि खेळावर बराच परिणाम झाला आहे.

नदालची टेनिस इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्कृष्ट खेळाडूंमध्ये गणना केली जाते. गेली जवळपास दोन दशके नदाल, रॉजर फेडरर आणि नोव्हाक जोकोविच या त्रिकुटाने टेनिसविश्वावर वर्चस्व गाजवले. यापैकी फेडररने २०२२ च्या लेव्हर चषकात नदालसह दुहेरीची लढत खेळून टेनिसला भावनिक निरोप दिला होता. आता ३८ वर्षीय नदालने आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करत टेनिसमधून निवृत्त होण्याचे ठरवले आहे. डेव्हिस चषकाचा अंतिम टप्पा स्पेनच्या मालेगा येथे १९ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत खेळवला जाणार आहे.

''टेनिस कारकीर्दीत मी जे काही अनुभवले, ते एखाद्या स्वप्नासारखे होते. मी या खेळाला माझे सर्वकाही दिले. सर्वोत्तम कामगिरीसाठी कायम प्रयत्न केले. मी आता अतिशय समाधानाने निवृत्ती घेत आहे'', असे नदाल म्हणाला. त्याने समाजमाध्यमांवर चित्रफीत प्रसिद्ध करत निवृत्तीची घोषणा केली. यावेळी नदाल भावुक झाला होता.

''गेली काही वर्षे माझ्यासाठी खूप आव्हानात्मक ठरली. विशेषतः गेल्या दोन वर्षांत मला बराच संघर्ष करावा लागला. दुखापतींमुळे माझ्या शरीरावर आणि खेळावर खूप मर्यादा आल्या. निवृत्तीचा निर्णय सोपा नव्हता. खूप विचार केल्यानंतरच मी या निर्णयापर्यंत पोहोचलो. आयुष्यात प्रत्येक गोष्टीला सुरुवात आणि शेवट असतेच. टेनिस कारकीर्द संपविण्याची हीच योग्य वेळ असल्याचे मला वाटले'', असेही नदालने नमूद केले.

लाल मातीचा बादशाह

फ्रेंच खुल्या स्पर्धेतील अविश्वसनीय वर्चस्वामुळे नदाल 'लाल मातीचा बादशाह' म्हणून ओळखला जातो. लाल मातीच्या कोर्टवर होणाऱ्या या स्पर्धेत नदालने तब्बल १४ वेळा जेतेपद पटकावले. २००५ साली फ्रेंच स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या नदालने येथे खेळताना तब्बल ११२ सामने जिंकले आणि केवळ चारमध्ये पराभव पत्करला. तसेच त्याने अमेरिकन स्पर्धेत चार, ऑस्ट्रेलियन स्पर्धेत दोन आणि विम्बल्डनमध्ये दोन अशी एकूण २२ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावली. त्याच्यापेक्षा केवळ जोकोविचला (२४) अधिक ग्रँडस्लॅम जेतेपदे मिळवता आली आहेत.

फेडरर, जोकोविचचा विशेष उल्लेख

टेनिसमधून निवृत्ती जाहीर करताना नदालने आपले पारंपरिक प्रतिस्पर्धी फेडरर आणि जोकोविच यांचा विशेष उल्लेख केला. ''आम्ही खूप वेळ एकमेकांबरोबर घालवला आहे. आम्ही कोर्टवर तासंतास एकमेकांविरुद्ध खेळलो. माझ्या आयुष्यातील काही अमूल्य क्षण मी त्यांच्याबरोबर खेळतानाच अनुभवले आहेत. हे क्षण आयुष्यभर माझ्या स्मरणात राहतील'', असे नदाल म्हणाला. जुलै-ऑगस्टमध्ये पॅरिस येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील एकेरीच्या दुसऱ्या फेरीत नदालला जोकोविचकडूनच पराभव पत्करावा लागला होता. दुहेरीत त्याने कार्लोस अल्कराझसह उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. या स्पर्धेनंतर तो पुन्हा टेनिस कोर्टवर उतरलेला नाही.

फेडररकडून आभार...

नदालने समाजमाध्यमांवर चित्रफीत प्रसिद्ध करत आपली निवृत्ती जाहीर केली. त्याच्या या चित्रफितीखाली फेडररने त्याला शुभेच्छा दिल्या आणि त्याचे आभारही मानले. ''फारच उत्कृष्ट कारकीर्द, राफा ! हा दिवस कधीही येणार नाही अशी मी आशा करत होतो. मात्र, प्रत्येकाला कधीतरी थांबावेच लागते. तू जे अविस्मरणीय क्षण अनुभवायची संधी दिलीस आणि आपल्या सर्वांच्या लाडक्या खेळात जे यश संपादन केलेस, त्यासाठी तुझे आभार. तुझ्यासह खेळणे हा माझ्यासाठी मोठा मान होता'', असे फेडररने लिहिले.

टाटा न्यासांचे उत्तराधिकारी म्हणून नोएल टाटांचे नाव चर्चेत

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

टाटा समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या निधनाने १६५ अब्ज डॉलरच्या टाटा समूहाच्या देखरेखीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या टाटा न्यास (टाटा ट्रस्ट) या संस्थेतही नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. टाटा सन्समध्ये टाटा ट्रस्टची बहुसंख्य हिस्सेदारी असून आणि त्याचे मानद अध्यक्षपद रतन टाटा यांच्याकडे होते.

टाटा न्यासांमध्ये विशेषतः सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्ट, यांची एकत्रितपणे टाटा सन्समध्ये ६६ टक्के हिस्सेदारी आहे. या न्यासांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य क्षेत्रात सेवाभावी कार्यासह, दानकर्म केले जाते. रतन टाटा यांच्या पश्चात त्यांचे सावत्र भाऊ नोएल टाटा हे नाव या दोन प्रमुख टाटा न्यासांच्या अध्यक्षपदासाठी प्रामुख्याने चर्चेत आहे.

रतन टाटा यांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून कोणाचीही नियुक्ती केली नव्हती आणि उत्तराधिकारी नेमण्याचा निर्णय त्यांनी विश्वस्त मंडळावर सोपवला होता. त्यानुसार नवीन अध्यक्षाची निवड आता विश्वस्तांवर अवलंबून असून, जे उमेदवाराच्या अंतिमतः निवडीपूर्वी, अंतरिम प्रमुखाची नियुक्ती करण्याची शक्यता आहे.

पारंपरिकरीत्या, टाटा ट्रस्टचे नेतृत्व टाटा कुटुंब आणि पारशी समुदायाशी संलग्न राहिले आहे. टाटा सन्स आणि टाटा न्यास या दोहोंच्या अध्यक्षपदाची दुहेरी भूमिका हाताळलेले रतन टाटा हे शेवटचे होते. मात्र २०२२ पासून, टाटा सन्सचे अध्यक्ष आणि टाटा न्यासांचे अध्यक्ष या भूमिका स्वतंत्र राहतील याची खात्री करून, विश्वस्त मंडळाच्या रचनेत बदल करण्यात आले. हे बदल टाटा न्यासांचा कारभार अधिक मजबूत करण्याच्या समूहाच्या प्रयत्नांचा एक भाग होता.

प्रमुख दावेदार कोण?

रतन टाटा यांच्या निधनानंतर, टाटा न्यासाचे संभाव्य अध्यक्ष म्हणून समूहातील अनेकांची नावे घेतली जात आहेत. विश्वस्त मंडळावरील अनेकांचा संभाव्य उत्तराधिकारी म्हणून विचार केला जात आहे. टीव्हीएस समूहातील ज्येष्ठ उद्योगपती वेणू श्रीनिवासन आणि माजी संरक्षण सचिव विजय सिंग यांचीही नावे चर्चेत आहेत. दोघेही न्यासाचे उपाध्यक्ष म्हणून सध्या काम करतात आणि वर्ष २०१८ पासून त्यांनी न्यासाच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि, प्रमुख दावेदारांमध्ये रतन टाटा यांचे सावत्र भाऊ आणि ट्रेंट लिमिटेड या टाटा समूहातील कंपनीचे विद्यमान अध्यक्ष नोएल टाटा हे नाव आहे. टाटा कुटुंबातील सदस्य असणे आणि चार दशकांहून अधिक कालावधीचा टाटा समूहातील त्यांचा व्यापक अनुभव त्यांच्याकडे आहे. नोएल टाटा २०१९ मध्ये सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त बनले आणि नंतर ते २०२२ मध्ये सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळात सामील झाले. जर त्यांची निवड झाली तर नोएल हे सर दोराबजी टाटा ट्रस्टचे अकरावे आणि सर रतन टाटा ट्रस्टचे सहावे अध्यक्ष असतील.

बँकिंग समभागांतील तेजीने सेन्सेक्सला बळ

मुंबई : जागतिक बाजारातील मजबूत कल आणि बँकिंग, ऊर्जा क्षेत्रातील समभागांमध्ये गुंतवणूकदारांनी खरेदीचा सपाटा लावल्याने प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी सकारात्मक पातळीवर स्थिरावले. कोणत्याही मोठ्या घटनेच्या अभावी आणि परकीय निधीचा मोठा ओघ नसूनदेखील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्सने १४० अंशांची कमाई केली.

दिवसअखेर सेन्सेक्स १४४.३१ अंशांनी वधारून ८१,६११.४१ वर स्थिरावला. दिवसभरात, त्याने ३५३.७४ अंशांची कमाई करत ८२,००२.८४ ही पातळी गाठली होती. दुसरीकडे निफ्टीमध्ये १६.५० अंशांची किरकोळ वाढ झाली. तो २४,९९८.४५ पातळीवर बंद झाला.

टीसीएसच्या माध्यमातून दुसऱ्या तिमाहीत कामगिरीच्या हंगामाची सुरुवात झाली आहे. जागतिक पातळीवर आशियाई बाजारांनी चांगली सुरुवात केली. मात्र अमेरिकेत महागाई वाढीच्या चिंतेने युरोपियन बाजारांमध्ये घसरण झाल्याने सकाळच्या सत्रातील फायदा टिकवून ठेवता आला नाही, असे निरीक्षण जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

'टीसीएस'ला ११,९०९ कोटींचा तिमाही नफा

पीटीआय, नवी दिल्ली

टाटा समूहातील आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) सप्टेंबरअखेर संपलेल्या तिमाहीतील आर्थिक कामगिरी, पूर्वनियोजनाप्रमाणे गुरुवारी जाहीर केली. कंपनीने गेल्या वर्षीच्या तुलनेत या तिमाहीत ४.९९ टक्के वाढीसह ११,९०९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदविला आहे.

टाटा समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या बुधवारी रात्री झालेल्या निधनामुळे तिमाही कामगिरीच्या घोषणेसाठी गुरुवारी संध्याकाळी नियोजित पत्रकार परिषद कंपनीने रद्द केली. मात्र मूळ नियोजनाप्रमाणे संचालक मंडळाची बैठक पार पडली आणि त्यानंतर जुलै-सप्टेंबर तिमाहीतील कामगिरीचे विवरण कंपनीने भांडवली बाजाराला नियमानुसार सादर करण्यात आले.

प्रति समभाग १० रुपये लाभांश

टीसीएसच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी झाली. या बैठकीत १ रुपये दर्शनी मूल्याच्या प्रत्येक समभागासाठी १० रुपये लाभांश जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. कंपनीने जाहीर केलेला हा दुसरा अंतरिम लाभांश आहे.

माहिती-तंत्रज्ञान सेवेतील देशातील सर्वात मोठ्या कंपनीने गेल्या वर्षी सप्टेंबरअखेर संपलेल्या तिमाहीत ११,३४२ कोटी रुपयांना निव्वळ नफा कमावला होता, तर यंदा जूनअखेर संपलेल्या तिमाहीत १२,०४० कोटी रुपयांचा करोत्तर निव्वळ नफा मिळविला होता. टीसीएसचा महसूल ७.०६ टक्क्यांनी वाढून ६४,९८८ कोटी रुपयांवर पोहोचला असून, तो गेल्या वर्षी याच तिमाहीत ६०,६९८ कोटी रुपये होता.

जुलै-सप्टेंबर तिमाहीत टीसीएसचा परिचालन नफा २४.१ टक्क्यांवर आला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात किंचित ०.२ टक्के घसरण झाली आहे. कंपनीतील एकूण मनुष्यबळ गेल्या तिमाहीत ५,७२६ ने वाढून ६,१२,७२४ वर पोहोचले आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येत कंपनीने ११ हजारांनी भर घातली आहे.

पाकिस्तान पराभवाच्या छायेत

ब्रूक-रूट जोडीमुळे इंग्लंड भक्कम स्थितीत

मुलतान : जागतिक क्रिकेटमधील उगवता तारा अशी ख्याती मिळवलेल्या हॅरी ब्रूकचे (३१७ धावा) झंझावाती त्रिशतक, तसेच त्याने जो रूट (२६२) याच्यासह रचलेल्या विक्रमी भागीदारीच्या जोरावर पाकिस्तानविरुद्ध पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात इंग्लंडने वर्चस्व मिळवले आहे. इंग्लंडने ७ बाद ८२३ धावांची उत्तुंग मजल मारत आपला पहिला डाव घोषित करताना २६७ धावांची आघाडी मिळवली. त्यानंतर पाकिस्तानची चौथ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात ६ बाद १५२ अशी स्थिती होती. ते अद्याप ११५ धावांनी पिछाडीवर असल्याने इंग्लंडला विजयाची संधी आहे.

मुलतान क्रिकेट स्टेडियमच्या सपाट खेळपट्टीवर ब्रूक आणि रूट जोडीने ठाण मांडताना तब्बल ४५४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडच्या दोन फलंदाजांनी मिळून कोणत्याही गड्यासाठी रचलेली ही सर्वोच्च भागीदारी ठरली. चौथ्या दिवशी दुसऱ्या सत्रात या दोघांनी धावांची गती वाढविण्याचा प्रयत्न केला. अखेर फिरकीपटू सलमान आघाने रूटला बाद करत ही जोडी मोडीत काढली. रूटने ३७५ चेंडूंत १७ चौकारांसह २६२ धावांची खेळी केली. रूट बाद झाल्यानंतरही ब्रूकने आपला झंझावात कायम राखला. २४५ चेंडूंत आपले द्विशतक साकारणाऱ्या ब्रूकने पुढील १०० धावा केवळ ६५ चेंडूंतच पूर्ण केल्या. त्यामुळे त्याने ३१० चेंडूंत आपले त्रिशतक पूर्ण केले. पुढे कामचलाऊ फिरकीपटू सैम अयुबच्या गोलंदाजीवर ब्रूक बाद झाला. त्याने ३२२ चेंडूंत २९ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ३१७ धावा फटकावल्या. अखेर इंग्लंडने ७ बाद ८२३ धावांवर आपला डाव घोषित केला.

त्यानंतर दुसऱ्या डावात पाकिस्तानची सुरुवातच अडखळती झाली. पाकिस्तानने आघाडीचे सहा फलंदाज ८२ धावांत गमावले. मात्र, सलमान आघा (नाबाद ४१) आणि आमीर जमाल (नाबाद २७) यांनी ही पडझड थांबवताना पाकिस्तानचे सामन्यातील आव्हान शाबूत ठेवले.

महाराष्ट्रासमोर जम्मू-काश्मीरचे आव्हान

श्रीनगर : महाराष्ट्राचा संघ जम्मू-काश्मीरविरुद्ध आज रणजी करंडक मोहिमेची सुरुवात करेल. सलामीवीर ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राच्या संघात अनुभवी फलंदाज अंकित बावणे, युवा अष्टपैलू अर्शिन कुलकर्णी, डावखुरा फिरकीपटू सत्यजीत बच्छाव यांचा समावेश आहे. ऋतुराज आणि अंकित यांच्याकडून महाराष्ट्राच्या संघाला सर्वाधिक अपेक्षा असतील. दुसरीकडे, जम्मू-काश्मीर संघात वेगवान गोलंदाज उमरान मलिक आणि अब्दुल समदचा समावेश आहे. त्यांच्या कामगिरीकडे लक्ष असेल.

दमदार सलामीचे मुंबईचे लक्ष्य!

नवी दिल्ली : प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या नव्या हंगामाला आज, शुक्रवारपासून सुरुवात होणार असून गतविजेत्या मुंबईची सलामीला बडोद्याशी गाठ पडणार आहे. गतहंगामाची रणजी जेतेपदाने सांगता केल्यानंतर मुंबईने देशांतर्गत क्रिकेटच्या नव्या हंगामाची इराणी चषक जिंकून सुरुवात केली. आता हीच लय कायम राखण्याचा अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील मुंबई संघाचा प्रयत्न असेल.

रितू राणी अकादमी उपांत्यपूर्व फेरीत

पुणे : एसएनबीपी अखिल भारतीय १६ वर्षांखालील हॉकी स्पर्धेत रितू राणी अकादमी संघाने आर के रॉय अकादमी संघाला ४-४ असे बरोबरीत रोखताना सरस गोल सरासरीच्या आधारे 'ब' गटातून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अन्य सामन्यात राऊंड ग्लास अकादमी संघाने प्रादेशिक विकास केंद्राचा ७-१ असा पराभव केला. हर्षज्योत सिंगने तीन, अमनदीपने दोन आणि गुरज्योत सिंग, वरिंदर सिंगने एकेक गोल केला. चेन्नई इलेव्हनने हॉकी ब्लेलुलाई संघाचा १६-० असा धव्वा उडवला. अन्य एका सामन्यात यजमान एसएनबीपी अकादमी संघाने जय अकादमीवर ७-१ असा विजय मिळवला.

फुटबॉल स्पर्धेत पूर्व विभाग विजेते

पुणे : भारतीय अन्न महामंडळाच्या अखिल भारतीय स्तरावरील आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत पूर्व विभागाने विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात त्यांनी दक्षिण विभागावर टायब्रेकरमध्ये ६-५ असा विजय मिळवला. नियोजित वेळेत सामना १-१ असा बरोबरीत राहिला होता. शूट-आऊटमध्ये तुषार हेमब्रम, दीपेश मुर्मु, आकाश दत्ता, एस.के. अरिफ, मोहम्मद एहतेसामन इस्माईल, मृण्मय सामंत यांनी अचूक गोल केले. पराभूत संघाकडून मोहम्मद लियाकश, जेराल्ड मॅथ्यू, दीपू के. एम., विनीत कुमार, व्ही. मुरुगन यांनाच यश आले.

क्रिकेट स्पर्धेत नू.म.वि. संघ विजयी

पुणे : जिल्हा क्रीडा परिषद आणि पुणे महापालिका शिक्षण मंडळ आयोजित आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात नू.म.वि. प्रशालेने विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात त्यांनी ग्रीन वूड स्कूलचा दहा गडी राखून पराभव केला. ग्रीन वूड संघाने २० षटकांत ७ बाद १४२ धावा केल्या. नू.म.वि. संघाने १७ षटकांत बिनबाद १४३ धावा करून विजय मिळवला. युवराज (नाबाद ६९) आणि स्वराज (नाबाद ५३) या मोरे बंधूंनीच प्रशालेचा विजय साकार केला. विभागीय स्पर्धेत आता नू.म.वि. प्रशाला पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करेल.

फॉर्म ए
जाहीर घोषणा

(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ (स्वैच्छिक अवसायन प्रक्रिया) नियम, 2017 मधील नियम 14)

कनेक्ट मार्केटिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड च्या भागधारकांचे लक्ष वेधण्यासाठी

1	कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव	कनेक्ट मार्केटिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड
2	कॉर्पोरेट व्यक्ती च्या स्थापनेचा दिनांक	17 मे 1982
3	ज्यांचे अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती स्थापित / नोंदणीकृत आहे त्या प्राधिकरणाचे नाव	कंपनी निबंधक, पुणे
4	कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U72900PN1982PTC150615
5	कॉर्पोरेट व्यक्ती च्या नोंदणीकृत व मुख्य कार्यालयाचा पत्ता (असल्यास)	204 सॅफायर चेंबर्स, पहिला मजला, बाणेर रोड, बाणेर, पुणे, एन.आय.ए., पुणे, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत, 411045
6	कॉर्पोरेट व्यक्तीच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	8 ऑक्टोबर 2024
7	अवसायकाचे नाव, अवसायकाचा पत्ता, अवसायकांचा टेलिफोन क्रमांक, अवसायकांचा नोंदणी क्रमांक :	**नाव : संदीप जयंत कुलकर्णी** **पत्ता :** 27/2, गुजरात कॉलनी, हॉटेल समर्थ जवळ, पौड रोड, वनाझ कॉर्नर, कोथरूड पुणे, महाराष्ट्र - 411038 **ईमेल आयडी :** kulkarni.sandeep@rediffmail.com **दूरध्वनी क्र. :** 9673000045 / 9922688378 नोंद. क्र. : IBBI/IPA-002/IP-NO1080/2021-2022/13714
8	दावे सादर करण्याचा शेवटचा दिनांक	7 नोव्हेंबर, 2024

याद्वारे सूचित करण्यात येते की **कनेक्ट मार्केटिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड** यांनी **दि. 8 ऑक्टोबर 2024** रोजी स्वैच्छिक अवसायन सुरु केले आहे.

याद्वारे **कनेक्ट मार्केटिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड** च्या भागधारकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी **दि. 7 नोव्हेंबर, 2024** पर्यंत पुराव्यांसह आपले दावे प्रवेशिका क्र. 7 वर नमूद करण्यात आलेल्या अवसायकांच्या पत्त्यावर व ईमेल वर सादर करावेत.

वित्तीय घेणेकरयांनी पुराव्यांसह आपले दावे केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावेत. इतर सर्व भागधारकांनी पुराव्यांसह आपले दावे टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावेत.

खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकतो.

स्वा/-
सीएस आयपी संदीप जयंत कुलकर्णी
स्वैच्छिक अवसायक
आयबीबीआय नोंदणी क्र. : IBBI/IPA-002/IP-N01080/2021-2022/13714
असाइनमेंटची अधिकृतता (एएफए) : AA2/13714/02/311225/203501
एएफए वैधता : 31/12/2025

दिनांक : 11.10.2024
ठिकाण : पुणे

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट -IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
नोंदणीकृत कार्यालय :- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014 शाखा कार्यालय : 560, पाचवा मजला, मार्व्हल व्हिस्टा, एस. क्र. 599ए-598+593ए, साहनी सुजन पार्क, लुल्ला नगर, पुणे, महाराष्ट्र - 411040 शाखा कार्यालय : 5 ए, बी, सी, डी, पाचवा मजला, श्रीरंग ऊस, जंगली महाराज मंदिर समोर, जे एम रोड, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र - 411005 शाखा कार्यालय : 12, स्पंदन, सर्वे. क्र. 117/1, पॉप्युलर नगर, वारजे, पुणे, महाराष्ट्र - 411052

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/PUN/0120/768 806 रवींद्र परशराम वाघमारे / वंदना रवींद्र वाघमारे, शाखा : पुणे	रु. 13,50,422.63 दिनांक 13.09.2022 रोजी नुसार	प्रत्यक्ष	बिल्डिंग ए2, दुसरा मजला, फ्लॅट क्र. 205, संगम रियल्टी चाकण ?नेक्स, गट क्र. 255, गाव शेलगाव, ता. खेड, पुणे, महाराष्ट्र - 411039.	रु. 9,41,000/-	रु. 94,100/-	26-10-2024	रु. 10,000/-	15.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/KRDI/0518/529344 विनोदसिंग छोटूसिंग परदेशी / श्रुतिशिका परदेशी / विनायकसिंग छोटूसिंग परदेशी, शाखा : खराडी	रु. 31,57,581.59 दिनांक 27.08.2022 रोजी नुसार	प्रत्यक्ष	सिंगल बिल्डिंग, पहिला मजला, 101, गुरु विहान, गट क्र. 234, पुणे 412207, प्रभुराम नगर, फुलमळा रोड, पुणे, महाराष्ट्र - 412207.	रु. 19,35,000/-	रु. 1,93,500/-	26-10-2024	रु. 10,000/-	16.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/PUN/0516/286244 आणि HOU/PUN/1215/257838 अरविंद प्रल्हाद शिर्के / प्रल्हाद दिनकर शिर्के, शाखा : पुणे	रु. 19,58,687.57 दिनांक 15.09.2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष	फ्लॅट क्र. 601 6वा मजला, गट क्र. 262 263 269 270 271 272 273, लाईफ मॅक्सिमा, किरकटवाडी, किरकटवाडी, पुणे, महाराष्ट्र - 411024.	रु. 15,70,000/-	रु. 1,57,000/-	26-10-2024	रु. 10,000/-	17.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/PUN/0519/695050 माधव गोरख खांदवे / लंका माधव खांदवे शाखा : पुणे	रु. 28,94,769.34 दिनांक 19.02.2020 रोजी नुसार	प्रत्यक्ष	फ्लॅट क्र. 1004, 10 वा मजला, स्प्रिंग वुड्स, बिल्डिंग / विंग बी फेज 1, मारुंजी, पुणे, महाराष्ट्र - 411057.	रु. 15,00,000/-	रु. 1,50,000/-	26-10-2024	रु. 10,000/-	18.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/PUN/0817/423597 विठ्ठल बाळा धुरी / अनुसया बाळू धुरी शाखा : पुणे	रु. 19,10,017.77 दिनांक 15.07.2022 रोजी नुसार	प्रत्यक्ष	सिंगल बिल्डिंग, पहिला मजला, 103, आरव फ्लोरिस्टा, प्लॉट क्र - 91/92 राधेश्री सोसायटी, बकोरी रोड, जेएसपीएम कॉलेज जवळ, वाघोली, पुणे, महाराष्ट्र - 412207.	रु. 19,83,000/-	रु. 1,98,300/-	26-10-2024	रु. 10,000/-	23.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/PUN/0617/399177गणेश मुरलीधर साताळकर / प्रतिमा गणेश साताळकर, शाखा : पुणे	रु. 7,11,497.36 दिनांक 16.06.2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष	बिल्डिंग ए1, 5वा मजला, 507, प्लेटॅर पौड ए, गट क्र 222 ते 226/230, तहसीलदार कार्यालय जवळ, पौड गाव मुळशी, पुणे, पुणे, महाराष्ट्र - 412108.	रु. 7,80,000/-	रु. 78,000/-	26-10-2024	रु. 10,000/-	22.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/WRJE/0318/502956 श्याम राजेंद्र जोगदंड / अश्विनी श्याम जोगदंड शाखा : वारजे	रु. 13,33,378.6 दिनांक 16.06.2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष	208, दुसरा मजला, विंग आय, श्री सिद्धिविनायक पार्क, गट क्र. 31/2(भाग) आणि 49 (भाग), वडकी गाव, पुणे - 412308, पुणे, महाराष्ट्र - 412308	रु. 9,37,000/-	रु. 93,700/-	26-10-2024	रु. 10,000/-	15.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	28.10.2024 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकूम नाही आणि विक्रीचा उल्लेख स्तंभ क्रमांक- के मध्ये केला आहे. संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003 वेबसाइट - www.bankeauctions.com मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती श्री. पंकज तिवारी / अमोल माने, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

स्थान : पुणे, खराडी, कोंढवा, नाशिक, वारजे, दिनांक : 10.10.2024 — **स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

हे पत्र **वैदेही ठाकर** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठाकर** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.